**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – सुरज संजय कासार

माझे वय २२ वर्षे व्यवसाय शिक्षण

राहणार शेरणखेल, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–</u>**

**१.** दिनांक ३०.०३.२०१९ रोजी आमचे गावामध्ये सप्ताह असल्याने मी, माझे वडील संजय राधाकिसन कासार व माझी आजी शांताबाई राधाकिसन कासार असे मिळून माझे चुलते रामनाथ राधाकिसन कासार यांचे पॅशन–प्रो मोटारसायकल वरून जात असताना आमच्या मोटारसायकलीचा अपघात झाला. त्या अपघातामुळे माझ्या पायाला दुखापत झाली होती. माझ्या आजीच्या हाताला दुखापत झाली होती. पिंपळगाव नाकविंदा येथील मारुती काळे यांनी आम्हाला उचलले. त्यांनी आमच्या घरातील लोकांना बोलावून घेतले. तो अपघात शेरणखेल ते पिंपळगाव या रस्त्यावर झाला. तो अपघात कसा झाला व कोणत्या वाहनामुळे झाला, हे मला सांगता येणार नाही. तो अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला, हे मला सांगता येणार नाही. आता मला ती फिर्याद दाखवली. त्यावरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, फिर्यादीतील मजकूर मला आठवत नाही. त्या फिर्यादीवरील सहीला **<u>निशाणी पी–३५</u>** देण्यात आली. पोलिसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविलेला नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०३.२०१९ रोजी मी, माझे वडील संजय राधाकिसन कासार, माझी आजी शांताबाई राधाकिसन कासार व चुलती सुशिला रामनाथ कासार असे माझा चुलता रामनाथ कासार यांच्या मोटारसायकल नं.एम.एच.१४–सी.आर.३१४७ वरून आमच्या वस्तीवरून गावात सप्ताह असल्याने सप्ताहासाठी जात असताना आम्ही घराचे थोडे पुढे आलो असता माझे वडील संजय कासार यांचा मोबाईल घरी राहिल्याने ते मोबाईल आणण्यासाठी घरी पायी चालत गेले व आम्ही ती मोटारसायकल रोडच्या बाजूला लावून त्या मोटारसायकल जवळ उभे होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही शेरणखेल गावचे ओढयाजवळ उभे असताना रात्री ०८.३० वाजता अचानक समोरून शेरणखेल गावाकडून पिंपळगावाकडे जात असलेल्या एका मोटारसायकल स्वाराने आमच्या बाजूला येवून आम्हा तिघांना जोराची धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्या धडकेत आम्ही तिघे व मोटारसायकल रोडवर पडली. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला धडक देणा–या मोटारसायकलीवरील चालक हा देखील बाजूला जावून पडला व तो पडल्यानंतर परत उठून तेथून निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर सप्ताहाकरिता जाणारे आमच्या ओळखीचे पिंपळगावचे मारुती रामभाऊ काळे यांनी आम्हाला पाहून ते तेथे थांबले व त्यांनी अपघातात धडक देणा–या मोटारसायकलीचा नंबर पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी त्या मोटारसायकलीचा क्र.एम.एच.१७–२०५८ असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर माझे वडील संजय कासार हे आम्हा तिघांना खाजगी वाहनातून साबळे हॉस्पीटल, अकोले येथे घेवून आले. हे म्हणणे खरे नाही की, तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी मला व माझी आजी शांताबाई हिला कुटे हॉस्पीटल, संगमनेर येथे पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, डॉक्टरांनी मला व माझ्या आजीला

तपासून माझ्या उजव्या पायाला जबर मार लागल्याचे व माझ्या आजीच्या उजव्या हाताला मार लागल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, माझी चुलती सुशिला रामनाथ कासार हिला त्या अपघातामध्ये किरकोळ मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.०४.२०१९ रोजी आम्हाला समजले की, आम्हाला धडक दिलेली मोटारसायकल बजाज प्लॅटीना नं.एम.एच.१७–२०५८ ही आरोपी गोविंद ज्ञानदेव वाळुंज हा चालवित होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपघातामध्ये आरोपीच्या मोटारसायकलीवर पाठीमागे बसलेल्या अर्जुन हरिभाऊ लगड याच्या हाताला देखील गंभीर दुखापत होवून त्याच्या हाताचे हाड फ्रॅक्चर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०३.२०१९ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास शेरणखेल, ता.अकोले येथील किनई ओढयाजवळ आम्ही रोडच्या कडेला मोटारसायकल जवळ उभे असताना आरोपीने त्याची बजाज प्लॅटीना मोटारसायकल क्र.एम.एच.१७–बी.सी–२०५८ ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवून आम्हाला धडक देवून अपघात केला व अपघातानंतर आम्हा जखमींना मदत न करता त्याचे वाहन घेवून पळून गेला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, मी आरोपीविरुध्द अकोले पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला.

३. आता मला फिर्यादीतील पोर्शन मार्क 'अ' व पुरवणी जबाबातील पोर्शन मार्क 'ब' मधील मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर मी पोलिसांना सांगितलेला नव्हता. पोलिसांनी तसा मजकूर का नमूद केला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपी सोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये, म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–</u>

४. नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.10 15:08:26 +0530

(डी.एम.हिंग्लजकर)
दिनांक – ०९.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,
ता.अकोले, जि.अहमदनगर